# जिल्हा परिषद अमरावती

कॅम्प रोड, अमरावती ४४४ ६०१
दुरध्वनी क्रमांक :- ०७२१ २६६२०१२/२६६२९३२

ईमेल dyceogadzpamt@gmail.com Website :- www.zpamravati.gov.in

## जिल्हा परिषद पॅनल वरील विधीतज्ञ पदाकरिता जाहीरात

जावक क्रमांक - जि.प./सा.प्र.वि/विधी/८८०/२०२४ दिनांक :-30/09/२०२४

जिल्हा परिषद अमरावती यांच्या आस्थापनेवर पॅनल वरील विधीतज्ञ यांची नियुक्ती करावयाची आहे. सदर पदाकरिता शैक्षणिक अर्हता, अनुभव आणि मानधन आणि इतर अटी व शर्ती जिल्हा परिषद संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.

| अ.क्र | पद | भरावयाची पदे | एकत्रित अनुज्ञेय मासिक मानधन |
|---|---|---|---|
| १ | जिल्हा परिषद पॅनल वरील विधितज्ञ उच्च न्यायालय खंडपीठ नागपुर | दोन | १५०००/- |
| २ | जिल्हा परिषद पॅनल वरील विधितज्ञ तालुका स्तर | तीन | ७५००/- |

वरील पदासाठी शैक्षणीक अर्हता ,अनुभव वयोमर्यादा , सेवा कराराच्या अटी व शर्ती , कर्तव्य व जबाबदाऱ्या आणि अर्जाचा विहीत नमुना या www.zpamravati.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात आलेला आहे. इच्छुक व पात्र उमेदवारांनी त्याचे पुर्ण भरलेले अर्ज आवश्यक कागदपत्रासह दिनांक 0६/10/२०२४ रोजी सांयकाळी ५.०० वाजेपर्यंत सामान्य प्रशासन विभाग , जिल्हा परिषद,अमरावती येथे सादर करावे.लिफाफ्यावर **जिल्हा परिषद पॅनल वरील विधितज्ञ** पदाकरिता अर्ज असा स्पष्ट उल्लेख करावा.

| | |
|---|---|
| **बालासाहेब बायस** | **संजीता महापात्र (भा.प्र.से)** |
| उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा) | मुख्य कार्यकारी अधिकारी |
| जिल्हा परिषद अमरावती | जिल्हा परिषद,अमरावती |

# जाहिरात

## जिल्हा परिषद अमरावती

## (सामान्य प्रशासन विभाग )

## जि.प.अमरावती करिता वकील पॅनल नियुक्ती बाबत

एकुण पद संख्या -

१. उच्च न्यायालय खंडपीठ नागपुर - ०२

२.पंचायत समिती स्तरावरील - ०३ (धामणगाव रेल्वे/ चांदुर रेल्वे/नांदगाव खंडश्वर-०१)

----- (अंजनगाव सुर्जी/दर्यापुर-०१)(मोर्शी/वरुड-०१)

०५

अमरावती जि.प.करिता स्थानिक स्तरावरील न्यायालय औद्योगिक न्यायालय /शाळा न्याय प्राधिकरण अमरावती, कामगार न्यायालय तसेच जिल्हयांतर्गत तालुकास्तरीय न्यायालये तसेच नागपुर येथील उच्च न्यायालय खंडपीठ नागपुर तसेच महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण नागपुर व सर्वोच्च न्यायालय दिल्ली या व इतर न्यायालयीन प्रकरणाकरिता जिल्हा परिषद अमरावती करिता वकील पॅनल गठीत करणे .

१. पात्रता अ) एल.एल.बी किंवा त्यापेक्षा जास्त
   ब) बार कॉन्सील ऑफ महाराष्ट्र अँड गोवा किंवा बार कौन्सील ऑफ इंडिया येथील नोंदणी.

२. अनुभव - न्यायालयात वकील व्यवसाय केल्याचा १० वर्षाचा अनुभव

३. सादर करावयाची कागदपत्रे - १. शैक्षणीक पात्रतेचे प्रमाणपत्र
   २. बार असोसिएशन परवाना
   ३. अनुभव प्रमाणपत्र
   ४. रहिवाशी प्रमाणपत्राच्या स्व साक्षांकित प्रमाणपत्र

४. यापुर्वी जिल्हा परिषदेच्या वकील पॅनल वर असल्यास त्यांच्या कामांचे मुल्यमापन करुन समिति निर्णय घेतील .

५. अर्ज सादर करावाचा अंतिम दिनांक

६. मुलाखतीचा दिनांक -

७. अर्ज सादर करावयाचे ठिकाण -

८.टिप - जिल्हा स्तरावरील व तालुकास्तरावरील व उच्च न्यायालय नागपुर न्यायालयाकरिता स्वतंत्रपणे अर्ज करणे बंधनकारक राहिल.

९. अर्ज सादर करावायाचे ठिकाण - उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा)
जिल्हा परिषद अमरावती

उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा)
जिल्हा परिषद ,अमरावती

# अमरावती जिल्हा परिषद , अमरावती
## (सामान्य प्रशासन विभाग)
## अटी व शर्ती

अमरावती जिल्हा परिषदेची न्यायप्रविष्ठ प्रकरणे चालविण्याकरिता वकील पॅनलसाठी जिल्हा परिषद अमरावतीने कामगार /औद्योगिक /जिल्हा व सत्र् न्यायालय /अप्पर आयुक्तांकडील अपील प्रकरणे तसेच मा.महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मा.उच्च न्यायालय , मा.सर्वोच्च न्यायालय तसेच इतर वरिष्ठ मुख्यालयीन न्यायपीठांमध्ये जिल्हा परिषद अमरावती येथील तालुका स्तरावरील तसेच वरिष्ठ मुख्यालयीन न्यापिठांमध्ये जिल्हा परिषद अमरावतीने वकील पॅनलवर नियुक्त करण्यासाठी /नियुक्त केलेल्या वकीलांसाठी ठरवुन दिलेल्या अटी व शर्ती खालील प्रमाणे आहे.

१. ज्या वकीलांना जिल्हा परिषद अमरावती तर्फे नियुक्ती दिली असेल त्यांना नियुक्ती दिल्याच्या आदेशाचे दिनांकापासुन अमरावती जिल्हा परिषदेच्या विरुध्द असलेले कोणतेही न्यायालयीन प्रकरण /दावा प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे स्विकारता येणार नाही.

२. जिल्हा परिषदेचे न्यायालयीन प्रकरणे साधारणः क्रमवारीने देण्यात येतील . परंतु न्यायालीन प्रकरणामध्ये वकील नियुक्तीबाबत उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा) अमरावती यांचा निर्णय अंतर्गत राहील.

३. अमरावती जिल्हा परिषदेचे नियुक्त वकील म्हणुन खालील प्रमाणे मानधनासाठी ते पात्र् राहतील व इतर कोणताही जादा खर्च मंजुर केल्या जाणार नाही.

४. अ) अमरावती येथील किंवा इतरत्र् न्यायालयातील व इतर न्यायपीठातील मुळ दाव्याकरिता प्रति दावा रु.७५००/- मंजुर केल्या जाईल

ब) मा.उच्च न्यायालय तसेच मा.प्रशासकीय न्यायाधिकरणांतील दाव्यांचा प्रकरणी प्रती दावा रुपये १५०००/- मंजुर केल्या जाईल.

५. वकील फी व सादील / किरकोळ खर्चाची रक्कम संबंधित दाव्याचे अंतिम न्यायनिर्णय नंतर संबंधित खातेप्रमुख यांचेकडून अदा केले जाईल.

६. प्रत्येक न्यायालयीन खर्चाबाबत त्याची पावती/ प्रमाणपत्र देयकासोबत जोडणे आवश्यक राहील. अशी पावती पडताळणी करतांना त्यास मंजुरी देणे किंवा नाकरणे किंवा दुरुस्ती मंजुरी देणे याबाबतचे अधिकार संबंधित खाते प्रमुखांना राहतील. याबाबत उत्पन्न झाल्यास अंतिम निर्णय घेण्याचा अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प.अमरावती यांना राहील.

७.न्यायप्रविष्ठ प्रकरणी अतिरिक्त वकीलांची नियुक्ती करणे किंवा प्रकरण कार्यवाहीत असताना अन्य दुस-या वकीलास चालविण्यास देणे किंवा प्रकरण सहमतीने आपसी करारानुसार अंतिम निकाली काढण्याचे अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी अमरावती यांना राहतील.

८.रुपये १००/- चे बंधपत्रावर विहीत अटी व शर्तीचा करारनामा संगणीकृत /टंकलिखीत करुन दिल्यानंतर बंधपत्राची कार्यवाही दहा दिवसात पुर्ण करावी.

९.सोपविलेल्या न्यायप्रविष्ठ दाव्यांचा अहवाल दरमहा उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा) जिल्हा परिषद अमरावती यांना पाठवावा कामकाज असमाधानकारक वाटल्यास कोणतीही पुर्वसुचना किंवा लेखी पत्र न देता पॅनलमधुन नाव कमी करण्याचे संपुर्ण अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद अमरावती यांना राहतील .

१०. जिल्हा परिषदेचे पॅनलवरील वकीलांनी अमरावती जिल्हा परिषदचे वतीने न्यायालयात तात्काळ उत्तरे दाखल करण्याची दक्षता घ्यावी. त्यांना संबंधित विभागाकडून दस्तऐवज /माहिती वेळीच प्राप्त

न झाल्यास उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा) अमरावती यांना लेखी स्वरुपात / दुरध्वनी व्दारे तात्काळ कळविण्यात यावे .

११. अर्ज विहित नमुण्यात करावा.

१२. कररन्याचा कालावधी नेमणुक दिल्याचा आदेशाचे दिनांकापासुन तिन वषापर्यंत बंधनकारक राहील. मुदतवाढ देण्याबाबत समिती निर्णय घेईल.

उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा)
जिल्हा परिषद ,अमरावती